नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

# प्रेस नोट

दिनांक 26/07/2021 (सोमवार)
(सकाळ)

---

## ट्रॅक्टर चे ट्रॉली चोरणा–या इसमांना स्थानिक गुन्हे शाखेने केले गजाआड........

दिनांक 25/07/2021 रोजी स्थानिक गुन्हे शाखा, नागपुर ग्रामिण चे पथक रामटेक उपविभागात गस्त करीत असतांना सदर पथकास गोपनीय बातमीदारा कडुन खात्रीशीर माहीती मिळाली की, एक महिंद्रा कंपनीचे बिना क्रमांकाचे लाल रंगाचा ट्रॅक्टर ज्याचा ट्रॉली वरील क्र. एम-40/ए-4032 असा आहे तो अरोली वरून रामटेक च्या दिशेने येत आहे व त्या ट्रॅक्टर ला लागुन असलेली ट्रॉली ही चोरीची असण्याची शक्यता आहे. मिळालेल्या माहीती प्रमाणे अरोली ते रामटेक महामार्गावरील पर्वत रिसोर्ट समोर सदर पथकाने पंच व स्टॉफ सह वाहनांची तपासणी करीत असतांना मिळालेल्या माहीती प्रमाणे एक लाल रंगाचा ट्रॅक्टर ट्रॉली सह दोन इसम येतांना दिसले. सदर ट्रॅक्टर चालकास त्यास ट्रॅक्टर थांबविण्याचा इशारा केला असता तो पळुन जाण्याचा प्रयत्न करीत होता. त्यांना थांबवुन पाहणी केली असता त्यांचे ताब्यातील ट्रॅक्टर हा नविन बिना क्रमांकाचा व त्यास असलेली ट्रॉली वर क्र. एमएच–40/ए–4032 असा क्रमांक असल्याचे दिसुन आले. संशय आल्याने त्यांना ट्रॅक्टर व ट्रॉली बाबत विचारपुस केली असता त्या दोघांनीही उडवाउडवीची उत्तरे दिली. त्यांना विश्वासात घेवुन अधिक विचारपुस केली असता ट्रॅक्टर चालक नामे रवी बापुजी वाडीभसमे, वय 29 वर्ष, रा. वार्ड क्र. 3, अरोली ता. रामटेक जि. नागपुर सांगीतले की त्याने त्याचे ताब्यातील ट्रॅक्टर हा त्याने स्वतःचे उदरनिर्वाहा करीता जावयाचे नावाने विकत घेतला परंतु पैशांअभावी नविन ट्रॅक्टरसोबत ट्रॉली खरेदी करणे शक्य झाले नाही. म्हणुन याने त्याचा मित्र प्रदीप सहदेव डोकरीमारे, वय 27 वर्ष, रा. वार्ड क्र. 2, काचुरवाही ता. रामटेक जि. नागपुरयाचे सहृयाने ट्रॉली चोरण्याची योजना आखली. त्यानुसार त्याचे ताब्यातील ट्रॅक्टरचे सहाय्याने दिनांक 19/07/2021 चे रात्रीचे सुमारास त्यांनी रामटेक बायपास रोडवरील दिप हॉटेल चे बाजुला असलेल्या सिताराम इंजीनीयरींग वर्कशॉप समोरून ट्रॉली चोरी केले असल्याचे सांगीतले.यावरून पो.स्टे. रामटेक येथुन सदर घटने बाबत माहीती घेतली असता त्याबाबत पोस्टे रामटेक येथे अप.क्र. 324/21 कलम 379 भादवि प्रमाणे गुन्हा नोंद असल्याची माहीती प्राप्त झाली. पंचासमक्ष घटनास्थळ जप्ती पंचनामा प्रमाणे एक लाल रंगाची जुनी ट्रॉली क्र. एमएच–40/ए– 4032 ज्याचा चेचिस क्र. 001224/10/06 किं. 50,000/–रू व एक नविन लाल रंगाचा बिना क्रमांकाचा महिन्द्रा 575 DIXP Pl ने Bhoomiputra कंपनीचा ट्रॅक्टर ज्याचा इंजीन क्र. NMB2GCE 0129 किं. 6,50,000/–रू. असा एकुण 7,00,000/–रू चा मुद्देमाल त्यांचे जप्त करण्यात आला आहे. सदर प्रकरणात पोलीस स्टेशन रामटेक हे पुढील तपास करीत आहे.

सदरची कार्यवाही मा.पोलीस अधीक्षक श्री. राकेश ओला नागपुर ग्रामीण, मा. अपर पोलीस अधीक्षक श्री. राहुल माकणिकर ना. ग्रा. यांचे मार्गदर्शनात स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक श्री अनिल जिटट्ावार, सपोनि राजीव कर्मलवार, सपोनि जितेंद्र वैरागडे, पोउपनि नरेंद्र गौरखेडे, पोहवा ज्ञानेश्वर राऊत, पोना दिनेश आधापुरे, पोशि विपीन गायधने, रोहन डाखोरे, अमोल वाघ, चालक अमोल कुथे व सायबर सेल चे सतिश राठोड यांनी पार पाडली.



पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर